# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property And Arresting Gangsters**

**Police Station** :- **SP Office, Washim**

**Date of Good Work done** :- **15/01/2022**

**Brief of the work done :-**

मा.पोलिस अधीक्षक श्री @IPS_Bachchan यांचे मार्गदर्शनाखाली वाशिम जिल्ह्यातील मागील तीन महिन्यात झालेल्या चोरी, जबरी चोरी, दरोडा मधील तब्बल 20 आरोपी अटक करून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे व आरोपिंविरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात येत आहे.

# जिल्ह्यात तीन महिन्यात २० दरोडेखोरांवर पोलिसांची कारवाई

- नोव्हेंबर ते जानेवारी महिन्यातील घटना
- पोलिसांच्या चांगल्या कामगिरीबद्दल होतहेत कौतुक
- आतांपर्यंत चोरी प्रकरणातील आरोपींच्या आवळल्या मुसक्या

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ▪ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दरोडेखोरांनी दरोडे टाकण्याचे प्रयत्न केले. यामुळे नागरिकांत भितीचे वातावरण निर्माण झाले होते; परंतु पोलिसांनी जिल्ह्यातील नागरिकांना धीर देत गेल्या तीन महिन्यातील २० दरोडेखोरांसह अन्य छोटे-मोठे चोरी करणाऱ्यांवर देखिल पोलिसांनी कडक कारवाई करत मुसक्या आवळल्याने नागरिकांमधून पोलिसांच्या चांगल्या कामगिरीबद्दल कौतुक होत आहे. याही पुढे पोलिसांनी अशी कामगिरी करावी, अशी अशा करत आहेत.

जिल्ह्यात गेल्या नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात दरोडेखोरांचे प्रकरण वाढल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते; परंतु पोलिसांकडून नागरिकांना धीर देत तीन महिन्या पासून दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या जात असल्याने नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास निर्माण होत आहे. आतापर्यंत झालेल्या घटनांवर



पोलिसांनी दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत त्यात, अर्धा किलो सोने देतो त्या बदल्यात ५ लाख रुपये द्या, असे निरोप देवून पैसे घेवून आलेल्या इसमास जबर मारहाण करुन त्याच्याकडील रक्कम लुटणाऱ्या चोरट्यांना अवघ्या २४ तासात मुद्देमालासह अटक करण्याची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने पार पाडली. याप्रकरणी रिसोड पोलिसात तीन आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करुन अटक केले.एस.टी.चे सेवानिवृत्त कर्मचारी किसनराव धोत्रे यांची मोटर सायकल पंक्चर करुन गाडीमधील तीन लाखाची बॅग घेऊन पोबारा करणाऱ्या टोळीला अटक करण्यात रिसोड पोलिसांना यश आले. ही लुटमारीची घटना ३ सप्टेंबर २०२१ रोजी रिसोड येथे घडली होती. त्यावेळी पोलिसांनी संबंधित अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल केला होता. संबंधित गुन्ह्याबाबत कसुन चौकशी केली असता आरोपींनी सदर गुन्ह्याची कबुली दिली. याही प्रकरणातील चार आरोपींना पकडण्यात यश आले.त्यानंतर समृध्दी महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराचे साईटवरील साहित्य चोरी होण्याच्या घटना वाढल्या होत्या. चोरट्यांनी कंपनीचे स्टील रॉड, डिझेल आदी साहित्य चोरुन नेण्याचा सपाटा लावला होता. २९ डिसेंबरच्या रात्री दरोडा टाकण्याच्या तयारीत असतांना सदर चार चोरट्यांना जऊळका पोलिसांनी जेरबंद केलेले आहे.

वाशिम तालुक्यातील अनसिंग येथे शनिवारच्या मध्यरात्रीनंतर सराफा मार्केटमध्ये चोरीचा प्रयत्न करणारे चार दरोडेखोराना अखेर अनसिंग पोलिसांनी जेरबंद केले. तसेच दरोडेखोरानी चोरी केल्याची कबुली दिली होती. रिसोड येथे दोन मोटारसायकल चोरट्यांना अटक केले होते.त्यात १३ जानेवारी रोजी वाशिम येथील लाखाळा परिसरात राहणाऱ्या किशन शशिकांत देवाणी यांच्या राहत्या घरात घुसुन, दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन दरोडेखोरांना अटक करण्यात वाशिम पोलिसांना यश आले. त्यामुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल आदर वाढला आहे. या प्रकरणातील अन्य आरोपी लवकरच अटक करु. अशी माहीती जिल्हा पोलिस यांनी दिली.अशा दरोडेखोरांच्या घटना वाढत असल्याने नागरिकांत भितीचे वातावरण झाले होते. त्यात वाशिममधील ताजी घटना असतांना पोलिसांनी रातोरात आरोपींना पकडून अटक करण्यात आले. त्यामुळे पोलिसांबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. (का.प्र.)

**चोरट्यांविरुध्द मोहिम राबवून अधिक कडक कारवाई करावी!**

जिल्ह्यात दरोडेखोरांवर वचक मिळवण्यात पोलिसांना यश आले आहे. गेल्या तीन महिन्यापासून दरोड्यात वाढ झाली आहे, हे नक्की खरे. त्यात पोलिसांना आरोपींना पकडण्यात यशही येत आहे. त्यामुळे पोलिसांचे नागरिकांमधून कौतुक होत आहे; परंतु जिल्ह्यातील काही भागात चोऱ्यांचे प्रमाण कमी होत नाही. त्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी चोरट्यांविरुध्द एक मोहिम राबवून अधिक कडक कारवाई करावी, अशी मांगणी नागरिकांमधून केल्या जात आहे.

**२४ तासात आरोपी जेरबंद**

वाशिम शहरात १३ जानेवारी रोजी संध्याकाळच्या दरम्यान लाखाळा परिसरात दरोडा टाकण्याचा दरोडेखोरांचा प्रयत्न होता; परंतु काही कारणामुळे त्यांचा प्रयत्न पसला. लाखाळा परीसरातील ही घटना एक पोलिसां समोर एक चॅलेंज होती. मात्र स्थानिक गुन्हे शाखा पथकाने २४ तासात उकल करुन आरोपी गजाआड केले. यामुळे या परिसरातील नागरिक भयमुक्त झाले.